कोल्हापूर विमानतळाच्या विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यासंदर्भात.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. मविवि-१२१६/प्र.क्र.१४४/२८-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि.९ मे, २०१८.

वाचा :१.शासन निर्णय क्र.एमएडीसी २०१२/प्र.क्र.३५४/२८-अ, दि.२१ ऑगस्ट, २०१३
२.अध्यक्ष, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.Plg/५०१/ Kolhapur/२०१६/२००८, दि.१८ नोव्हेंबर, २०१६
३. शासन समक्रमांक पत्र दि.१८ मे २०१७
४.उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. मविविकं २०१७/प्र.क्र.०९/भुसं/०३९५, दि.४ जुलै, २०१७
५. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. मविविकं २०१७/प्र.क्र.१३८/भुसं/०९४३, दि.१ नोव्हेंबर, २०१७
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. मविविकं २०१७/प्र.क्र.०९/भुसं/११५५, दि.१६ डिसेंबर, २०१७
७. शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.विचासं-१११८/प्र.क्र.३५/२८-अ, दि.२३ एप्रिल २०१८

प्रस्तावना :

दि.१.०२.१९९७ रोजी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण व महाराष्ट्र शासन यांचेमध्ये झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने कोल्हापुर विमानतळ १५ वर्षांच्या कालावधीसाठी MIDC ला हस्तांतरीत करण्यात आला होता. सदर करार संपुष्टात आल्यानंतर शासन निर्णय दि.२१.०८.२०१३ अन्वये सदरहू विमानतळ भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार विमानतळाचा संपूर्ण विकास AAI ने करणे अपेक्षित होते. याअनुषंगाने, विमानतळाच्या विकासाबाबत रु.२७४.०० कोटी चा विकास आराखडा AAI ने सादर केला असून याअंतर्गत DGCA कडून आवश्यक परवाने प्राप्त करणे, वन जमिनी संपादित करणे, धावपट्टी विस्तारीकरण, नाईट लँडींग सुविधा, ATC टॉवर, टर्मिनल बिल्डींगचे बांधकाम, अंतर्गत रस्ते, इ. कामे करण्यात येणार आहेत. तथापि, सदर विकास आराखड्याच्या खर्चापैकी सुमारे २५-३० टक्के खर्च राज्य शासनाने उचलावा, अशी विनंती अध्यक्ष, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी दि.१८.११.२०१६ रोजी केली आहे. या विनंतीच्या अनुषंगाने विकास आराखड्याच्या अंदाजित खर्चाच्या रकमेपैकी २५-३० टक्के हिस्सा राज्य शासनामार्फत देण्याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी तत्वत: मान्यता दिली असून याबाबत केंद्र शासनास कळविण्यात आले आहे.

२. कोल्हापूर विमानतळ विकासासाठी १०.९३ हे. वन जमीन आवश्यक असल्याचे AAI ने कळविले होते. सदर वनजमिनीच्या निर्वनीकरणासाठी रु.१.८२ कोटी निधी लागणार आहे. दि.१८.०८.२०१६ रोजी मा.मंत्री, मदत, पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सदर रु.१.८२ कोटी निधी MADC ने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना उपलब्ध करुन द्यावा, असा निर्णय झाला आहे. सदर निधी उपलब्ध करुन द्यायला MADC तयार असल्याचे त्यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविले आहे. तथापि, सदर रकमेची प्रतिपूर्ती शासनाकडून करुन घेण्याबाबत MADC च्या संचालक मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार त्यांनी सुमारे रु.२.०० कोटी शासनाने MADC ला उपलब्ध करुन द्यावा, असा प्रस्ताव MADC ने शासनास दि.१ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

३. कोल्हापूर विमानतळ विकासासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त ५.८१ हे.आर जमिनीचे संपादनासाठी MADC ला दि.१८ मे २०१७ रोजीच्या पत्रान्वये "संपादन मंडळ" म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर जमिनीचे संपादनासाठी तसेच अनुषंगिक कामासाठी रु.२५.०० कोटी निधी वितरणाचा प्रस्ताव तसेच संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीचा तपशील MADC ने शासनास सादर केला आहे.

४. कोल्हापूर विमानतळ विकासाबाबत उपरोक्त प्रस्ताव मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आले होते. या सर्व प्रस्तावांना शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून त्यानुसार खालीलप्रमाणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

<u>शासन निर्णय :</u>

कोल्हापूर विमानतळासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे विकासकामांना व त्यापोटी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

१) विमानतळाच्या संपूर्ण विकासाबाबत AAI ने सादर केलेल्या रु.२७४.०० कोटी विकास आराखड्यापैकी २५ ते ३० टक्के म्हणजे सुमारे ८२.०० कोटी रक्कम राज्य शासनामार्फत AAI ला उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२) कोल्हापूर विमानतळ विकासासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त ५.८१ हे.आर जमिनीचे संपादनासाठी रु.२५.०० कोटी निधी MADC ला उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

३) कोल्हापूर विमानतळ विकासासाठी आवश्यक १०.९३ हे. वन जमीनीच्या निर्वनीकरणासाठी सुमारे रु.२.०० कोटी निधी शासनामार्फत MADC ला उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. या बाबतचा होणारा खर्च मागणी क्रमांक एन-७, ३०५३ नागरी विमानचालन, ०२ विमानतळ, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य, राज्य योजना (००) (०२) विमानतळाच्या विकासाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सहायक अनुदान (३०५३ ०१६४) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याबाबत उपसंचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८०५०९१७०३२९२००७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Madhav Vaman Godbole

Digitally signed by Madhav Vaman Godbole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d2dece5f3a4f469a1e421d9386418a11b3c1d62679cb7656ad02d464d1fb40f, serialNumber=e3e5082948977afe1d60c7937a8e48890a10857adbef0fda2aacc8fad7e55a9d, cn=Madhav Vaman Godbole
Date: 2018.05.09 17:04:25 +05'30'

(मा.वा.गोडबाले)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक
२. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
३. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
४. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अप्पर मुख्य सचिव, मा.मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय,मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव(उद्योग), उद्योग,उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई
९. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१०.प्रधान सचिव, (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
११.संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई.
१२.विभागीय कार्यकारी अधिकारी, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (प.क्षे.), मुंबई
१३.महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
१५.उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
१६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१८. निवड नस्ती.